'उप अभियंता (वाहतूक नियोजन)' पदावर
दि.०१/०१/२०२४ रोजी काम करणाऱ्या
अधिकाऱ्यांची अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीबाबत..

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी -४११ ०१८**
**क्र.सा.प्र.वि/१२/कावि/ ०२ /२०२५**
**दिनांक : ०७ /०७ /२०२५**

**वाचले क्र.** १) आदेश क्र.साप्रवि/१२/कावि/९२४/२०२४ दि.१०/१२/२०२४ अन्वये प्रसिध्द केलेली 'उप अभियंता (वाहतूक नियोजन)' पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी

२) श्री.पवार सुनिल व श्री.भोसले अभिमान यांचे आक्षेप अर्ज

३) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.२५/०९/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव

४) अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/१/कावि/११७५/२०१३ दि.२९/८/२०१३

५) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/७४/२०२१ दि. २८/०१/२०२१

६) सामान्य प्रशासन विभागाकडील दि. ०७ / ०७ /२०२५ चा मान्य प्रस्ताव

**आदेश**

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक २१/०६/२०२१ अन्वये दि.०१/०१/२०२४ रोजी **'उप अभियंता (वाहतूक नियोजन)'** या पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरच्या तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी मधील अधिकाऱ्यांचे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, ज्येष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा यादीमध्ये नांव नसलेबाबत हरकती काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

**'उप अभियंता (वाहतूक नियोजन)'** पदाची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी संबंधित अधिकाऱ्यांना बजाविलेबाबत सर्व संबंधित शाखाप्रमुखांकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्याने अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील. प्रस्तुत तात्पुरती सेवाज्येष्ठतायादीवर आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

**१) शैक्षणिक अर्हतेबाबत आक्षेप -**

श्री.पवार सुनिल व श्री.भोसले अभिमान यांनी वाढीव शैक्षणिक अर्हतेची नोंद घेणेबाबत दाखल केलेले आक्षेप, अर्हतेचे दाखले पाहून आक्षेप मान्य करण्यात आला आहे. तरी उपरोक्त मान्य आक्षेपाची यथार्थ नोंद अंतिम सेवाज्येष्ठतायादी मध्ये घेण्यात येत आहे.

**२) मानीव दिनांकाबाबत -**

श्री.भोसले अभिमान यांनी सेवाज्येष्ठतायादीमध्ये उपअभियंता (वाहतूक नियोजन) पदावरील पदोन्नती दिनांकामध्ये दुरुस्ती करुन मानीव दिनांकाची नोंद घेण्याबाबत हरकत अर्ज सादर केलेला आहे. हरकत अर्जाबाबत श्री.भोसले अभिमान यांनी आदेश क्र.सा.प्र.वि/२/कावि/९२९/२०२२ दि.३०/१२/२०२२ अन्वये मानीव दिनांक निर्धारित करणेबाबतचा आदेश सोबत जोडला आहे. निर्गत आदेशानुसार श्री.भोसले यांचा आक्षेप मान्य करुन सेवाज्येष्ठतायादीमध्ये दुरुस्ती करण्यात येत आहे.

सबब उपरोक्त वाचले क्रमांक ४ व ५ चे प्राप्त अधिकारान्वये **'उपअभियंता (वाहतूक नियोजन)'** पदाची दि.०१/०१/२०२४ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ नुसार अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे. ही अंतिम सेवाज्येष्ठतायादी मे.न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या सेवाज्येष्ठतायादीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

प्रत- संबंधित विभाग

२/-सदर आदेश व सेवाज्येष्ठतायादी मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

उप अभियंता (वाहतूक नियोजन) पदाची दि.01/01/2024 रोजीची अंतिम सेवाज्येष्ठतायादी

पे लेवल :- S-20 वेतनश्रेणी :- 56100 - 177500

| अ.क्र. | संगणक क्र. | अधिकाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | उप अभियंता (वाहतूक नियोजन) पदावरील रुजु तारीख | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नती/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्त दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 7369 | पवार सुनिल प्रभाकर | भटक्या जमाती (ब) | डी.सी.ई.,बी.ई. (सिव्हील), एम.टेक. (ट्रान्सपोर्टेशन इंजीनियरिंग) | 31/10/1974 | 28/12/2021 | पदोन्नती | स्था. अभि. सहाय्यक | 22/09/1998 | 31/10/2032 | |
| 2 | 10554 | भोसले अभिमान अरुण | अनुसुचित जाती | बी.ई.(सिव्हील), एम.टेक. (ट्रान्सपोर्टेशन इंजीनियरिंग) | 28/01/1982 | 28/12/2021 | पदोन्नती | कनिष्ठ अभि., स्थापत्य | 20/10/2012 | 31/01/2040 | मानीव तारीख - आदेश क्र. सा.प्र.वि/2/कावि/929/2022 दि.30/12/2022 |

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी 411 018.